# परिस्थितीजन्य संस्कार

श्रीमद् नामचैतन्य भानुदास
दि. २९–०९–२००९
दैनिक सकाळ, मुंबई यांच्या सौजन्याने

बाह्य परिस्थिती आणि वातावरणाचेही मानवी मनावर संस्कार होत असतात. दाहीदिशा दारिद्र्य असलेल्या एखाद्या भिकारी कुटुंबात जर एखादं बालक जन्माला आलं तर गर्भावस्थेतच आईच्या विचारांचे संस्कार त्याच्या मनावर झालेले असतात. जन्माला आल्यानंतर बाह्य परिस्थिती आणि वातावरण त्याला पूरक ठरतं. छप्पर फाटलेली झोपडी आजूबाजुला घाण आणि दुर्गंधी, धूळ आणि अडगळ. त्याही परिस्थितीत निसर्ग नियमानुसार ते बालक पंचज्ञानेंद्रियांमार्फत ज्ञान मिळवण्याचा प्रयत्न करत असतं. मोडक्या तोडक्या वस्तू–दगडधोंड्यांशी खेळण्यातच ते रमतं. थंडी पावसात ते उघडं नागडंच असतं, काहीपण खात असतं. त्याच्या 'मना'ने ही परिस्थिती स्वीकारलेली असल्याकारणाने, निसर्गच त्याची प्रतिकारशक्ती वाढवतो. वास्तविक हा नरकवास असूनही ते बालक मात्र जग हे असंच आहे आणि जीवन असंच असतं असं समजून आपल्याच विश्वात रमलेलं असतं. फाटक्या लक्तरानिशी ते मूल जेव्हा घराबाहेर पडतं, तेव्हा त्याच्याच सारख्या मुलांमध्ये ते मिसळतं. मानवी मनाचं हे वैशिष्ट्य आहे, की आपल्या स्वभावाशी, विचारांशी मिळत्या जुळत्या व्यक्तींशीच ते मैत्री करतं. अल्पवयातच ते मूल भीक मागू लागतं. भीक मागण्याची लाज किंवा खंत वाटणं तर सोडाच पण अर्थप्राप्ती केल्याचा अभिमान आणि आनंद त्याला होतो. बाह्य परिस्थिती आणि वातावरणामुळे त्याच्या मनावर झालेल्या संस्कारांचा हा सारा परिणाम असतो. देवभोळ्या मध्यमवर्गीयाच्या घरात नित्यनेमाने पूजाअर्चा होत असेल, तर त्या घरातील मुलं देवाला नमस्कार करणं आणि मोठ्यांच्या पाया पडणं पटकन शिकतात. उच्चभ्रू कुटुंबातील मुलांच्या मनावर त्यांच्या राहणीमानाचा स्तर आणि त्याला अनुसरून रीतीरिवाज यांचा पगडा फार लवकर बसतो. अध्यात्म–विज्ञान दृष्ट्या 'सॉफिस्टिकेशन इज अ सफोकेशन ऑफ माईंड.' आज मानव मोकळ्या मनाने आणि आनंदाने जीवन जगणंच विसरला आहे. लहान मुलांची 'मनं' अतिशय संवेदनशील असतात. त्यामुळे त्यांच्या मनावर फार लवकर आणि खोलवर 'संस्कार' होतात. एकदा एका चार वर्षांच्या मुलाने आपल्या दप्तरातून शाळेतील एक खेळणं आणलं. ''शाळेतलं खेळणं का आणलस?'' असं आईने प्रेमाने विचारल्यावर मुलाने प्रतिप्रश्न केला ''आपण मॉलमध्ये गेल्यावर आपल्याला आवडणाऱ्या वस्तू नाही का उचलून घरी घेऊन येत?'' चुकीच्या समजुतीमुळे अशा कृती घडतात. त्या मागचं कारण समजून घेऊन योग्य संस्कार करणं आवश्यक असतं. त्या मुलाने चोरी केली असं समजून त्याला दरडावणं, मारणं किती चुकीचं ठरेल? मॉलमधल्या वस्तू आपण विकत घेत असतो. आवडलेली वस्तू उचलून आणणं हे वाईट कसं ते त्याला समजवायला हवं. तसे संस्कार करायला हवेत. याच सदरात पुढे आपण संस्कारांप्रमाणे मनात प्रेरणा कशा उत्पन्न होतात ते पाहू.